स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग
दूरध्वनीक्र.022-25220097
EmailId:dfommcu@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनविभाग
**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**
**यांचे कार्यालय**

ब- ६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०२४

जा.क्र.कक्ष-9/जमिन/2167/सन 2022-23 दिनांक. 23/11 /2022.

प्रति,

सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय** : श्रीमती. रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांच्या कांदळवन तक्रारीबाबत. (तक्रार क्र.152)

**संदर्भ** : 1. आपलेकडील पत्र क्र.ल.ले/समिती/75, दिनांक.22/07/2022.
2. वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांच्याकडील पत्र क्र. ठा.कां/तक्रार/536, दिनांक.10/10/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये श्रीमती. रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांनी मिरा भाईंदर हद्दीतील मौजे पेणकरपाडा सर्वे क्रमांक 173, हिस्सा क्र. 5 ह्या कांदळवन व खाडी क्षेत्रातील झालेला बेकायदेशीर भराव व कुंपण आदी काढून नैसर्गिक स्थिती निर्माण करणेबाबतचा तक्रार अर्ज आपल्यामार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी नमूद जागेची स्थळपाहणी करून संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

1. सदरचे ठिकाण हे मौजे पेणकरपाडा स.क्र. 173 (जुना), नवीन 5, मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण 353- अ, हद्दीलगत पेरकरपाडा आरोग्य विभाग कार्यालय येथील आहे.
2. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
3. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे.
4. तक्रारीमधील क्षेत्र सरकारी आहे व सदरची जागा आरक्षण 353- अ हे मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या ताब्यातील आहे.
5. प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेवर घेतलेले जी.पी.एस. रिडींग खालीलप्रमाणे
   1. N 19 15 53.64 E 72 52 02.81 2. N 19 15 57.38 E 72 52 02.71
   3. N 19 15 55.43 E 72 52 02.59 4. N 19 15 55.55 E 72 52 01.07
6. वरील जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थवर घेऊन MRSAC नकाशावर सुपर इंम्पोज करुन तपासले असता सन 2005 साली नमूद जागेवर कांदळवन दिसून येत नाही. तसेच सद्यस्थितीत नमूद जागेवर कांदळवन दिसुन येत नाही.
7. तरी वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. तक्रार/479, दिनांक.23/09/2022 अन्वये मिरा- भाईंदर महानगरपालिका यांना त्याबाबत कळविलेले आहे. सोबत छायांकित प्रत अवलोकनार्थ जोडली आहे. त्यामुळे या विभागाकडील सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी, हि विनंती.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 473
दिनांक 29/11/2022 Dipesh to put up in the Committee
लिपिक उप वनसंरक्षक

(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी — मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी — सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन) मुंबई कांदळवन संधारण घटक, याच कार्यालय
वनराज सोसा.शेजारी,फॉरेस्ट कॉलनी, हरी ओम नगर रोड,कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603
Email:rfommcubhiwandi@gmail.com

जा. क्र./ ठा.कां/तक्रार/536/2022-23
ठाणे 400 603, दि. 10/10/2022

ति,

मा.विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक

## तक्रारी अर्जाबाबत पाहणी केल्याचा अहवाल

वषय:- श्रीमती रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांच्या तक्रारीबाबत. (तक्रार क्र. 152).

ंदर्भ:- 1. आपलेकडील पत्र क्र. जमीन/1066/सन 2022-23, दिनांक 01/08/2022.
2. वनपाल ठाणे (कांदळवन) यांचेकडील पत्र क्र. व.ठा./50/2021-22,दि. 29/11/2021.

ळ तक्रारदार नाव:- 1. श्रीमती रिया राजकिरण म्हात्रे, पत्ता नंदानिवास, हनुमान मंदिर जवळ, पेणकरपाडा, जिल्हा 401107, फोन क्र.7208333374 2. श्री. धीरज रमेश परब रा. भाईंदर ता. जि. ठाणे मो. क्र. 9967794952.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकित प्रकरणी श्री श्रीमती रिया राजकिरण म्हात्रे व श्री. धीरज रमेश परब यांनी क मौजे पेणकरपाडा, स.क्रं. 173 (जुना) नवीन 5 न.भू.क्रं.-निरंक मधील तक्रार अर्जाबाबतचा मुद्देनिहाय अ खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

1. स्थळाचे वर्णन:-जागेचे नाव- मौजे पेणकरपाडा स.क्र. 173 (जुना), नवीन 5, मिरा भाईंदर महानगरपालिका आ क्र. 353-अ, हद्दीलगत पेरकरपाडा आरोग्य विभाग कार्यालय,
   स.क्रं. 173 (जुना) नवीन 5 , न.भु.क्र.- निरंक
2. तक्रारीचा तपशील- मिरा भाईंदर हद्दीतील मौजे पेरणकरपाडा स.क्र. 173, हिस्सा क्र. 5 ह्या कांदळवन व क्षेत्रातील झालेला बेकायदेशीर भराव व कुंपण आर्दीबाबत.
3. स्थळाचे जी. पी. एस. रिडींग—
   1. $19^{O}$ 15' 53.64 " N व $72^{O}$ 52' 02.81" E  2. $19^{O}$ 15' 57.38" N व $72^{O}$ 52' 02.71" E
   3. $19^{O}$ 15' 55.43 " N व $72^{O}$ 52' 02.59" E  4. $19^{O}$15' 55.55" N व $72^{O}$ 52' 01.07" E
4. Geo tag Photo-सहपत्रात सोबत जोडून सादर करीत आहे.
5. स्थळपंचनामा-सहपत्रात सोबत जोडून सादर करीत आहे.
6. तक्रार क्षेत्राचा वैधानिक दर्जा—
   अ.) तक्रारीत नमूद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र आहे का? असल्यास अधिसुचना क्र.-नाही.
   तक्रारीतील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
   ब.) सदरचे क्षेत्र बफर झोन मध्ये येते का ? असल्यास अंतर (मी.)-
   सदर क्षेत्र हे कांदळवनापासून 50 मीटर बफर झोन मध्ये येत आहे.
   क.) सदरचे क्षेत्र खाजगी कांदळवन क्षेत्र आहे का ?
   सदरचे क्षेत्र खाजगी कांदळवन क्षेत्र नाही.
   ड.) सदरचे क्षेत्र सरकारी क्षेत्र आहे का? होय.
   सदरची जागा आरक्षण क्र. 353 अ हे मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या ताब्यातील आहे.

सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन होते का ?
सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन नाही.

8. सद्यास्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट अभिप्राय—
सद्यस्थीतीत जागेवर सदर जागेवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्र. 353 असे बोर्ड लावलेले आले. तसेच सद्यस्थीतीत पत्र्याच्या प्रवेशद्वाराच्या आत प्रवेश केला असता संपूर्ण क्षेत्रावरती दगड-मातीची भर केलेली दिसते. तसेच महानगरपालिकेचा कचरा आणून कचऱ्याची विभागणी करण्याचे काम चालु असल्याचे दिसून आले.

9. अधिसुचित कांदळवन क्षेत्र असल्यास प्रथम गुन्हा नोंद केला आहे का?- नाही.

10. अधिसुचित कांदळवन क्षेत्रा व्यतिरीक्त क्षेत्र असल्यास संबधित यंत्रणेस लेखी कळविण्यात आले आहे का?
या कार्यालयाचे पत्र क्र. 479/सन 2022-23,दि. 23/09/2022 अन्वये मा. मिरा-भाईंदर, महानगरपालिका यांना कळविले आहे.

11. कार्यवाही कोणत्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे-
सदर ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

12. वनक्षेत्रपाल यांचा तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय—
सद्यस्थीतीत जागेवर सदर जागेवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आरक्षण क्र. 353 असे बोर्ड लावलेले दिसून आले. तसेच सदर ठिकाणी 31 डिसेंबर 2005 साली MRSAC Map नूसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन नाही. सदरची जागा मिरा- भाईंदर महानगरपालिका यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. 479/सन 2022-23,दि. 23/09/2022 अन्वये कळविले आहे.

13. वनक्षेत्रपाल यांचा सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे? याबाबात स्पष्ट अभिप्राय-
सदरची जागा मिरा- भाईंदर महानगरपालिका यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. तरी सदर तक्रार निकाली काढणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपा लिका यांचेकडून कार्यवाही होणेस विनंती.

(विक्रांत वामन खाडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन).
मुंबई कांदळवन संधारण घटक

वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन), मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय
वनराज सोसा.शेजारी,फॉरेस्ट कॉलनी, हरी ओम नगर रोड,कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603
Email:rfommcubhiwandi@gmail.com

विषय:- श्रीमती रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांच्या तक्रारीबाबत.
जा.क्र. ठा.कां/जमिन/479/सन 2022-23
ठाणे ,400603 दि. 23/09/2022

प्रति,
मा. तहसिलदार, मिरा-भाईंदर
मिरा-भाईंदर

संदर्भ-1. श्रीमती रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांच्याकडील दिनांक 1/06/2021 रोजीचा मा. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना ई-मेल द्वारे प्राप्त तक्रारीबाबत.
2. आपलेकडील दिनांक 07/01/2021 रोजीची तक्रार.

उपरोक्त संदर्भ क्र. 1 अन्वये श्रीमती रिया म्हात्रे व श्री. धिरज परब यांनी केलेली मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे पेणकरपाडा स.क्र. 173,हिस्सा क्र. 5 ह्या कांदळवन व खाडी क्षेत्रातील झालेल्या बेकायदेशीर भराव व कुंपण आदी केलेबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रार प्राप्त क्षेत्र राखीव कांदळवन नाही. सदर ठिकाणी सन 2005 साली कांदळवन दिसून येत नाही. सद्यस्थीतीत सदर जागेवर भराव करून मिरा भाईंदर- महानगरपालिकेचे आरक्षण क्र. 353 असे बोर्ड लावलेले दिसून येत आहे व हे क्षेत्र 50 मीटर बफर झोन मध्ये येत आहे.

तसेच संदर्भ क्र. 2 अन्वये भाईंदर येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट केले बाबत तसेच (.प) बेकायदा भराव केले बाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सन 31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC Map नुसार तक्रारीतील नमुद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. सद्यास्थितीत मौजे भाईंदर स 1/342 .क्र ची जागा सरकारी असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यासाठी आरक्षित आहे 1/342 .क्र.तसेच स .यातील एकुण अन्वये अधिसुचित राखीव कांदळवन म्हणून 4 चे कलम 1927 क्षेत्र भारतीय वन अधिनियम .हे 103.8320 .आहे घोषित झालेतक्रारीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे कांदळवन क्षेत्र सोडून आहे.

तरी आपल्या माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(विक्रांत वामन खाडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन),
मुंबई कांदळवन संधारण घटक

व.प.अ.ठा.कां.मुं.कां.सं.घ/जमिन/general letter/22-23

# पंचनामा

1) श्री. विजय चंद्रकांत ठाकरे वय : ३० नोकरी
रा. ठाकरे निवास गणेशमंदीर जवळ पेणक
मिरारोड पूर्व. जि. ठाणे मो. नं : ८०८०४

2) श्री. रोहीत रवींद्र तोडणकर वय : ३५ नोकरी
किराणा स्टोअर्स रा. रूम न ५, ६ चाळ न
गांधी नगर, स्मशान भूमी रोड, पेणकरपाडा
मीरा रोड पूर्व जि. ठाणे मो. नं : ८४५१८७

आज दि. २३/११/२०२१ रोजी अ
पंचास वनपाल व वनरक्षक ठाणे व तक्रारद
पेणकरपाडा ग्रामस्थ श्री. दिपेश गावंड यांनी
बोलविल्यावरून मौजे. पेणकरपाडा स. न ३५
मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण
३५३/अ या खारफुटी क्षेत्रात भराव व कु
भिंत काढून टाकण्याच्या तक्रारीबाबत व
भगात वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे, भिवंडी यां
जा. क्र / २६८ / सन २०२१-२२ दि. ०३/०८/ २०२१
पत्रानुसार पंचनामा करणेकामी विनंती केल्या
आम्ही पंचलोक घटनास्थळाची परिस्थिती व
ती प्रत्यक्षात जागेवर पाहिल्याप्रमाणे पंचना
लिहून देत आहेत तो खालीलप्रमाणे.

आम्ही पंच वनाधिकारी, महस
विभागाकडील तलाठी सज्जा पेणकरपाडा नि
मदतनीस यांच्या समवेत मिरा भाईंदर महान
पालिकेने चारही बाजूला पत्र्याचे कुंपण (कम्प
केलेल्या संपूर्ण क्षेत्रात फिरती करून पाहणी
असता. कुंपण केलेल्या जमिन मधोमध मिरा भ
महानगरपालिका आरक्षण क्र ३५३-अ बोर्डाच्या

ुवन मिरा भाईंदर महानगरपालिका असा
नाफलक (बोर्ड) लावलेला दिसून आला
व त्याप्रमाणेच पत्र्याच्या कुंपणाजवळ प्रवेश
जवळ असाच सुचनाफलक लावलेला आम्हा
ंना दिसून आला या सुचनाफलकाचे आम्हा
समक्ष वनरक्षक ठाणे यांनी जिओ टॅग
टो घेतले. तसेच पत्र्याच्या कुंपणाच्या
तमध्ये संपूर्ण क्षेत्रावरती दगड-मातीची
ी केलेली दिसते तसेच महानगरपालिकेच्या
रा आणून कचऱ्याची विभागणी करण्याची
म चालू असल्याचे आम्हा पंचांना दिसले.
जागेच्या मधोमध आम्ही पंच उभे राहिलो
सता पश्चिम दिशेला दहीसर ते मिरा-रोड
सा पाण्याचा प्रवाह असलेला नाला दिसून
आला त्याला लागूनच जाफरी खाडीचे क्षेत्र
सल्याचे आम्हा पंचास दिसले. त्या जाफरी
ाडीमध्ये अवेसिनिया मरीना, अवेसिनिया
ऑफीसिनेलिस व कांदळवन सहयोगी झाडे
ुडूपांची झाडे असल्याचे दिसते. व पूर्व
ला चेणकरपाडा गाव आहे. उत्तर दिशेला
या भाईंदर महानगरपालिकेची वैकुंठ धाम,
मशानभूमी आहे. दक्षिण दिशेला शिवशक्ती
र आहे. या संपूर्ण क्षेत्राला महानगरपालिके
कडून सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याचे आम्हा
ंचांना दिसले. या पत्र्याच्या कुंपण मारलेल्या
ातील भागात छोटी-छोटी झुडूपे, रानटी
त उगलेले दिसले. तसेच या जागेचे
नरक्षक ठाणे यांनी आम्हा पंचासमक्ष
ी.पी.एस रिडींग घेतले ते खालीलप्रमाणे

1) N 19° 15' 53.64"
E 72° 52' 02.81"

2). N 19° 15' 57.3
E 72° 52' 02.7

3) N 19° 15' 55.43"
E 72° 52' 02.59"

4). N 19° 15' 55.5
E 72° 52' 01.0

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने होऊ वर्षापूर्वीपासून या जागेत दगड-मातीची भरणी के समजले व त्याचे स्पष्टीकरण माहे एप्रिल 2021 मध्ये केलेले वनाधिकाऱ्यांनी आजूबा आम्हा पंचासमक्ष विचारले असता समज तसेच या जागेत सध्यास्थितील कोणत्याही कांदळवनाची झाडे दिसून येत नाही. हे हे खाजगी महानगरपालिकेच्या मालकीचे असल्य समजले. हे क्षेत्र 'राखीव कांदळवन' अधिसू नसलेले क्षेत्र असून ते वनाधिकाऱ्यांनी पंचांना महाराष्ट्र शासनाची कांदळवनाची आ दाखविली त्यावरून आम्हा पंचाना खात्री

वरनमूद पंचनामा आम्हा पंचासमक्ष वनखात्याचे अधिकारी, महसूल अधिकारी घटनास्थळाच्या परिस्थिती व वस्तुस्थितीनु प्रत्यक्ष जागेवर हिंडून फिरून पाहिल्याप्रमा लिहीण्यात आला व पंचनामा लिहिल्या आम्हा सर्वांना मोठ्या आवाजात वाचून दाख लो बरोबर असल्याची खात्री झाल्यावर पंचांनी पंचनाम्यावर सह्या केल्या.

हा पंचनामा आज दि. 23/11/2021 4:30वाजता सुरु करुन 5:30pm वाजता पूर्ण केला.

ठिकाण : येनकुरपाडा
दिनांक : 23/11/2021.

पंचसही

1) विजय चंद्रकांत ठाकरे

2) रोहीत रवींद्र तोडणकर

र्ने


मोरे
म ठाठो


डिगानंद

म्हस्के
नकु ठाणे

ठाठो रखना भिरे

सन 2005




सन 2021

वनपाल ठाणे,


आरक्षण क्र.
३५३-अ
de: 19°15'56"
ude: 72°52'3"
ion: 11.11±8 m
acy: 10.5 m
23-11-2021 17:43
penkarpada


e: 19°15'55"
ude: 72°52'3"
on: -3.37±12 m
cy: 44.3 m
3-11-2021 17:42
enkarpada

वनपाल ठाणे,



आरक्षण क्र.
३५३-अ
Time: 23-11-2021 17:43
Note: penkarpada



Latitude: 19°15'56"
Longitude: 72°52'2"
Elevation: -16.37±16 m
Accuracy: 7.6 m
Time: 23-11-2021 17:42
Note: penkarpada

वनपाल ठाणे


सकारात्मक मुद्दा क्र १५१६.

पेणकरपाडा स. क्र. 173/5 मि भा म न पा दफनभूमीचे कंपाउंड - श्रीम. रिया म्हात्रे व अनिता पाटील, नगरसेविका




परिमंडळ वन अधिकारी
ठाणे, कांदळवन


Penkar pada
MRSAC
Legend
Complaint points
19°16
79
6
19°15'57.38"N, 72°52'2.71"E
19°15'55.55"N, 72°52'1.07"E
19°15'55.43"N, 72°52'2.59"E
5
19°15'53.64"N, 72°52'2.81"E
1
2
3
Shakti Nagar Rd
N
Image © 2021 Maxar Technologies